Sakal, Pune, February 27, 2012. Pp.8

# खोडदमध्ये साकारणार सायन्स पार्क

## पंतप्रधानांच्या खास निधीतून ५ कोटींची तरतूद; दोन वर्षांत होणार प्रकल्प पूर्ण

ओझर, ता. २६ : भारतातील विज्ञानक्षेत्रात मानबिंदू असलेल्या खोडदच्या जागतिक महादूर्बिण प्रकल्पामध्ये सायन्स पार्क साकारण्यात येणार आहे. त्यासाठी पंतप्रधानांच्या खास निधीतून ५ कोटींची तरतूद करण्यात येणार आहे. येत्या दोन वर्षांत हा प्रकल्प प्रत्यक्षात येईल, अशी माहिती महादूर्बिण प्रकल्पाच्या वरिष्ठ वैज्ञानिक निमिषा कंथारिया, तसेच प्रशासकीय अधिकारी जे. के. सोळंकी यांनी दिली.

शालेय तसेच महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना दैनंदिन जे प्रयोग शालेय पातळीवर करावे लागतात, ते करण्याची संधी या पार्कमध्ये उपलब्ध करून देण्यात येणार आहे. त्याचबरोबर एक तारांगणदेखील उभारण्यात येणार आहे. त्यामुळे ग्रह, तारे, तारका, आकाशगंगा यांची अनुभूती विज्ञानप्रेमींना या ठिकाणी घेता येईल. 'जीएमआरटी'मधून विद्यार्थी वर्गात विज्ञानाची आवड निर्माण व्हावी, यासाठी वैज्ञानिक सिनेमे पाहण्यासाठी दोनशे विद्यार्थी बसू शकतील, असे ऑडिटोरियम उभारण्यात येणार आहे. सामान्य विद्यार्थी आणि विज्ञानप्रेमींसाठी सध्या आठवड्यातील केवळ शुक्रवारी हा प्रकल्प पाहण्याची मुभा आहे. मात्र सायन्स पार्कच्या उभारणीनंतर आठवड्यातल्या सहा किंवा सात दिवसांत कधीही या प्रकल्पाला भेट देता येणार आहे. विद्यार्थ्यांना विज्ञानविषयक माहिती देण्यासाठी काही खास विज्ञानतज्ज्ञ या ठिकाणी नियुक्त करण्यात येणार आहेत, असेही त्यांनी सांगितले.

### आकाशातील घटकांचा नकाशा

महादुर्बिण प्रकल्पामध्ये सध्या आकाशातील संपूर्ण घटकांचा नकाशा तयार करण्याचे महत्त्वाकांक्षी काम सुरू असून, त्यासाठी गेल्या दोन वर्षांपासून अवकाशाचे निरीक्षण रेडिओ दुर्बिणीमार्फत सुरू आहे. त्यासाठी १० संगणक अहोरात्र निरीक्षणे घेऊन आकाशातील घटकांच्या प्रतिमा साकारत आहेत. आतापर्यंत अशा ३०० पेक्षा जास्त घटकांच्या प्रतिमा साकारण्यात आल्या असून, हे काम जागतिक पातळीवर केवळ खोडद दुर्बीण प्रकल्पानेच केले असल्याने त्यावर जगातील सर्व देशांतले खगोलशास्त्रज्ञ अभ्यास करून या घटकांवर अधिक महत्त्वपूर्ण प्रकाशझोत टाकू शकतील, असेही कंथारिया व सोळंकी यांनी सांगितले.

